rtmnuonline.com



**Bachelor of Arts (B.A.) Part-I First Semester Examination**

**MARATHI**

**(Optional)**

**(Literature)**

वेळ : तीन तास] [एकूण गुण : 80

**सूचना :**—(1) **पाचही** प्रश्न सोडविणे अनिवार्य आहेत.

(2) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.

1. 'कादंबरी' या वाङ्मय प्रकाराचे स्वरूप स्पष्ट करून कादंबरीच्या घटकांची चर्चा करा.

**किंवा**

'कथानक' हा कादंबरीचा गाभा असतो, हे तहान कादंबरीच्या माध्यमाने समजावून सांगा. 16

2. मराठी कादंबरीच्या वाटचालीचा इतिहास स्पष्ट करा.

**किंवा**

'रामकोर' ची व्यक्तिरेखा रेखाटा. 16

3. खालीलपैकी कोणत्याही **एका गटातील** अवतरणांचे संदर्भासहित स्पष्टीकरण लिहा :

**गट 'अ'**

(क) "आरे ओ बावाच्या नाना...त्या दिवशी तुवा कडबा आणलात ताटी लावली नव्हती वाटते बरोबर..."

(ख) "आपून इतक्या दिवस हे जंतूचच पाणी पिलो. अशानं होणार त नाईनं आपल्याले एखांदा रोग-बिग ?"

(ग) "माहयाच्यानंच झालं हे सम्द...आपून इतक्या वाळकोळ नाल्यात थांबाय नवतं पाहयजे..."

(घ) "इचार न तुपल्या बापाले. कशाची दौंडी झाली ते ! देवळात कीर्तन हाय का काय ते ?"

**किंवा**

**गट 'ब'**

(च) "आरे, मपली गाडी उलटली नं...त देलं पाणी वाटून हौदातलं म्हन्लं, बरी ते वढीच गारिबाची दुवा..."

(छ) "पुढी चाल न माणसं पाणी पिणार नाईत. एकमे कायचे नल्डे फोडून रगत पितान..."

(ज) "माती खावावं लागंल माती...कानून की आता जिकडी पहावं तिकडी माणसंच दिसतात किड्या-आळ्यावाणी."

(झ) "तू चूप बैस वर्षे ! पोरीच्या जातीनं भांडणात पडू नाई मोठ्या माणसायच्या..." 16

4. कोणत्याही **एकाच गटातील** प्रश्नांची उत्तरे थोडक्यात लिहा :

**गट 'क'**

(त) कथा आणि कादंबरी या दोन्ही वाङ्मयप्रकारात कोणते मूलभूत स्वरूपाचे भेद आहेत ?

(थ) कथेच्या बांधणीत भाषेचे महत्व स्पष्ट करा.

(द) कविता म्हणजे काय ? थोडक्यात स्पष्ट करा.

(ध) कवितेचे घटक कोणते आहेत ?

**किंवा**

rtmnuonline.com

### गट 'ख'

(प) साहित्याच्या वर्गीकरणाच्या दोन पातळ्या कोणत्या ?

(फ) 'कथेचे विशिष्ट कथानक प्रभावीपणे मांडव्याचे महत्वपूर्ण कार्य कथेतील पात्रे करीत असतात' हे स्पष्ट करा.

(ब) प्रबंध काव्याचे प्रकार कोणते ?

(भ) कविता या वाङ्मयप्रकाराची वैशिष्ट्ये कोणती आहेत ? 16

5. खालील **सर्व** प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा (**सर्व** प्रश्न अनिवार्य) :

(1) पिराचा चढ हा मरणाचा चढ कसा आहे ?

(2) 'वर्षा' या पात्राविषयी थोडक्यात लिहा.

(3) 'पारखेड' कोणत्या कारणामुळे जळले ?

(4) बबन राघोजीला अकोल्याला का घेऊन जातो ?

(5) 'निवेदन' या विषयी थोडक्यात लिहा.

(6) कथेच्या दोन व्याख्या लिहा.

(7) 'हायकू' या काव्यप्रकाराची माहिती लिहा.

(8) 'गझल' या काव्य प्रकाराविषयी थोडक्यात विवेचन करा. 16

835 835 www.rtmnuonline.com 835 www.rtmnuonline.com 835 835